महाराष्ट्र शासन
कामगार उप आयुक्त, यांचे कार्यालय,
बंगला नं. ५, पुणे मुंबई रस्ता, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.
Email id :- dyclpune@gmial.com

---

जा.क्र. काउआ/ बा.का./ज.जा.अभि 20963 दिनांक: 11/11/19

## परिपत्रक

विषय :- दि. ०७ नोव्हेंबर २०१९ ते ७ डिसेंबर २०१९ या कालावधीमध्ये बाल कामगार प्रथेविरुध्द जनजागृती करणेबाबत आवाहन.

---

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कामगार विभागामार्फ़त "बाल मजुरी" या अनिष्ठ प्रथे विरुध्द दि. ७ नोव्हेबर २०१९ ते ७ डिसेंबर २०१९ या कालवधीमध्ये जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. बाल कामगार प्रथेचे समुळ उच्चाटन होणेसाठी शासनामार्फ़त अनेक उपक्रम राबविले जात असून, आपणास याद्वारे आवाहन करण्यात येते की, आपणही आपले सामाजिक कर्तव्य म्हणून या अभियानात सहभागी व्हावे व बालकामगार प्रथेच्या उच्चाटणासाठी आपला सहभाग नोंदवावा अशी कामगार उप आयुक्त, पुणे कार्यालयातर्फ़े विनंती करण्यात येत आहे.

यास्तव आपण आपल्या आस्थापनेमधील सर्व अधिकारी / कर्मचारी, व कामगार यांना या उपक्रमामध्ये सामावून घेऊन त्यांना "बालकामगार कामावर न ठेवण्याबाबतची" शपथ द्यावी. व तशा आशयाचे हमीपत्र भरून घ्यावे. (सोबत शपथेचा नमुना व हमीपत्राचा नमुना जोडण्यात आला आहे.) आपण उक्तप्रमाणे कार्यक्रम घेऊन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा, ही विनंती.

(विकास पनवेलकर)
कामगार उप आयुक्त,
पुणे जिल्हा पुणे.

सोबत - वरिल प्रमाणे

प्रति,
व्यवस्थापक /संचालक

Scanned with CamScanner

# शपथ

मी शपथपुर्वक कथन करतो की, मी. १८ वर्षाच्या आतील कोणत्याही मुलाला किंवा मुलीला माझ्या व माझ्या कुटुंबियांशी संबंधित व्यवसायात अथवा घरकामास लावणार नाही. तसेच कोणत्याही आस्थापनेत बालकामगार काम करताना आढळल्यास तसेच धोकादायक आस्थापनांमध्ये किशोरवयीन मुले कामावर लावल्याचे आढळल्यास त्या आस्थापनेची माहिती कामगार विभाग अथवा पोलिस विभागास त्वरीत कळवीन. बालमजुरीची कलंकित व अनिष्ठ प्रथा नष्ट करुन "बालकामगार मुक्त महाराष्ट्र" करण्याच्या अभियानात तन मन धनाने क्रियाशील राहण्याचा मी. मन :पुर्वक निर्धार करीत आहे.

Scanned with CamScanner

# हमीपत्र

प्रति,

मा. कामगार उप आयुक्त,
बंगला नं. ५, पुणे-मुंबई रस्ता,
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.

**विषय :-** दिनांक ०७/११/२०१९ ते दिनांक०७/१२/२०१९ या कालावधीत बाल कामगार प्रथेविरुध्द जनजागृती मोहीम.

मी असे हमीपत्र लिहुन देतो की, आमच्या आस्थापनेमध्ये बालकामगार काम करीत नाही व भविष्यातही बालकामगार कामावर ठेवणार नाही. तसेच, १८ वर्षाखालील किशोरवयीन कामगारांना माझे घरी व व्यवसायामध्ये कामावर ठेवणार नाही. तसेच, सामाजिक कर्तव्य म्हणून मी माझ्या परिचयातील इतर व्यक्तिंनाही बाल कामगार न ठेवण्याबाबत आवाहन करीन.

आस्थापनेचे नाव व पत्ता :

आस्थापनेचा शिक्का :

भ्रमणध्वणी क्रमांक :

(मालक/ व्यवस्थापक)

Scanned with CamScanner